नगरपरिषद प्रशासन संचालनालय
७वा मजला, बेलापूर भवन, नवी मुंबई महानगरपालिका इमारत,
सी. बी. डी. बेलापूर, नवी मुंबई - ४००६१४

---

नपप्रसं २०२५/ म.मु.सोयी.सु .वि.ठो.त. /कक्ष-७/ 5481 दिनांक- 16 JUL 2025

वाचा :-

(१) नगर विकास, शासन निर्णय क्र-संकिर्ण-२०२५/प्र.क्र.७६(भाग-२)नवी-१६, दि. २८ मार्च, २०२५.
(२) नगर विकास, शासन निर्णय क्र-संकिर्ण-२०२५/प्र.क्र.७६(भाग-२)नवी-१६,(ई-१०३४४१५) दि.४ एप्रिल, २०२५.
(३) नगर विकास शासन निर्णय क्र.मनपा-२०२५/प्र.क्र.१४०/नवी-१६(ई-११६३८१४) दिनांक:-११ जून २०२५.
(४)नगर विकास विभाग शासन निर्णय क्रमांक:- मनपा-२०२५/प्र.क्र.२४६(क-५०)/ नवि-१६ (ई-८२८२६९) दि.१६ जून,२०२५.

**राज्यातील महानगरपालिका यांना सन २०२४-२५ साठी निधी वितरीत करण्याबाबत "महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोयीसुविधांच्या विकास ठोक तरतूद" योजनेअंतर्गत निधी वितरीत करण्याबाबत लेखाशीर्ष (४२१७०५४१) रक्कम रु.५,००,१२,०००/- ( रुपये पाच कोटी बारा हजार फक्त ) निधी वितरण आदेश क्र.१.**

वाचा मधील नगर विकास विभाग शासन निर्णय क्र-१ व २ अन्वये सन २०२४-२०२५ या वित्तीय वर्षासाठी "महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोयीसुविधांच्या विकासासाठी विशेष तरतूद" " लेखाशीर्ष (४२१७०५४१)" या योजनेअंतर्गत राज्यातील महानगरपालिकांना शासनाने वेळोवेळी आदेशीत केल्यानुसार निधी वितरीत करण्याकरिता संचालनालयास निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे.

उपरोक्त वाचा मधील संदर्भ क्र.३ व ४ च्या शासन निर्णयाचा निधी वितरण बाबत आदेश संचालनालयास प्राप्त झाले आहेत. सदर शासन निर्णयामधील "महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोयीसुविधांच्या विकासासाठी विशेष तरतूद" या योजनेखाली लेखार्शीर्ष (४२१७०५४१) ) **रक्कम रु.५,००,१२,०००/- ( रुपये पाच कोटी बारा हजार फक्त )** इतका निधी वितरीत करण्याबाबत आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. सदर

आदेशामध्ये निधी हा वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक:-संकीर्ण-१०.०२/प्र.क्र.१२८/अर्थोपाय ,दिनांक ६ जून,२००८ मधील तरतुदीनुसार खर्च करणे बंधनकारक राहील असे नमूद केले आहे. त्यानुषंगाने सोबत नमूद करण्यात आलेल्या विवरण पत्रातील परिशिष्ट अ मध्ये नमूद करण्यात आलेल्या जिल्हाधिकारी /जिल्हा प्रशासन अधिकारी /जिल्हा नियोजन अधिकारी (संबधित), यांना नगरविकास विभाग, नवि-१६ कडील शासन निर्णयाद्वारे वितरीत करण्याचे आदेशीत केल्यानुसार संबधितांनी कळविलेल्या त्यांच्या बँक खात्यावर निधी वितरीत करण्यात येत आहे.

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **परिशिष्ट-अ** | | | | | | |
| **आदेश क्र.१** | | | | | | |
| **सन २०२४-२५ आर्थिक वर्षाकरिता महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोयीसुविधांच्या विकासासाठी विशेष तरतूद योजना लेखाशीर्ष (४२१७ ०५४१)** | | | | | | |
| **अ.क्र.** | **जिल्हा** | **महानगरपालिका नांव** | **निधी वर्ग करण्यात आलेले कार्यालय** | **आदेश क्रमांक व दिनांक** | **रक्कम (आकडे रुपयात)** | **रक्कम (आकडे अक्षरात )** |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| **नगर विकास विभाग शासन निर्णय क्रमांक:- मनपा-२०२५/प्र.क्र.१४०/ नवि-१६ (ई-११६३८१४) दि.११ जून,२०२५ अन्वये निधी वितरण** | | | | | | |
| 1 | सोलापूर | सोलापूर महानगरपालिका | जिल्हाधिकारी/जिल्हा प्रशासन अधिकारी,सोलापूर | मनपा-२०२३/प्र.क्र५८३/भाग-१(क)/नवि -१६ दि.०७.११.२०२३ | 1,19,30,000.00 | रुपये एक कोटी एकोणीस लाख तीस हजार फक्त |
| 2 | सोलापूर | सोलापूर महानगरपालिका | जिल्हाधिकारी/जिल्हा प्रशासन अधिकारी,सोलापूर | मनपा-२०२४/प्र.क्र.१५६/भाग -९/नवि-१६ (ई-७८८४२५) दि.२५.०७.२०२४ | 2,10,62,000.00 | रुपये दोन कोटी दहा लाख बासष्ट हजार फक्त |
| **एकूण रक्कम रु.(अ)** | | | | | 3,29,92,000.00 | **रुपये तीन कोटी एकोणतीस लाख ब्याणणव हजार फक्त** |
| **नगर विकास विभाग शासन निर्णय क्रमांक:- मनपा-२०२५/प्र.क्र.२४६(क-५०)/ नवि-१६ (ई-८२८२६९) दि.१६ जून,२०२५ अन्वये निधी वितरण** | | | | | | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३ | मुंबई शहर | बृहन्मुंबई महानगरपालिका | जिल्हाधिकारी/जिल्हा नियोजन अधिकारी,मुंबई शहर | मनपा-२०२५/प्र.क्र.२४६(क -५०)/नवि-१६ (ई-८२८२६९) दि.१५.१०.२०२४ | 1,70,20,000.00 | रुपये एक कोटी सत्तर लाख वीस हजार फक्त |
| **एकूण रक्कम रु.(ब)** | | | | | **1,70,20,000.00** | **रुपये एक कोटी सत्तर लाख वीस हजार फक्त** |
| **एकूण (अ) + (ब)** | | | | | **5,00,12,000.00** | **रुपये पाच कोटी बारा हजार फक्त** |

वाचा मधील संदर्भ क्र. ३ व ४ च्या शासनाने निर्गमित केलेल्या मूळ शासन निर्णयामधील विहित केलेली कामे ,कार्यपद्धती, सर्व अटी व शर्ती लागू राहतील. त्यांचे काटेकोरपणे पालन करून जिल्हा नियोजन अधिकारी व महानगरपालिका यांनी आवश्यक ती कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल संचालनालयास सादर करावा. तसेच वितरीत करण्यात आलेल्या निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र संबधित महालेखापाल कार्यालयाकडे सादर करण्यात यावे व सदर उपयोगिता प्रमाणपत्राची एक प्रत संचालानालायास सादर करण्यात यावी.

सदर निधी खात्यात जमा झाल्यानंतर,७ दिवसात निधी प्राप्त झाल्याची पोहोच संचालनालयास सादर करावी. आपली पोहोच प्राप्त न झाल्यास संचालनालय आदेशान्वये आपल्या कार्यालयास निधी प्राप्त झाला आहे असे ग्राह्य धरण्यात येईल.

मा. आयुक्त तथा संचालक, न.प.प्र.सं. यांच्या मान्यतेने.

(संजय काकडे)
सह आयुक्त
नगरपरिषद प्रशासन संचालनालय,मुंबई

प्रत-

१. अवर सचिव, नगरविकास विभाग -१६, मंत्रालय, मुंबई -३२.
२. संबधित जिल्हाधिकारी / जिल्हा प्रशासन अधिकारी , जिल्हाधिकारी कार्यालय.
३. संबधित आयुक्त, महानगरपालिका.